# Maharashtra University of Health Sciences, Nashik

**Following documents need to available on web site**

***Trust Deed / Bylaws/ Registration Certificate (Trust / Hospital (Bombay Nursing Act))***

**Faculty : Nursing**

**Name of College/Institute : Jijau College of B. Sc. Nursing, Markhel, Degloor, Nanded.**

| | | |
|---|---|---|
| Name of Trust / Society | | **Saraswati Bahuuddeshiy Sevabhavi Sanstha, Gojegaon** |
| Registration Certificate<br>**To be uploaded on web site clear and original copy** | | Trust / Society :- MAH/485/99<br>**To be uploaded on web site** |
| | | Trust Deed / Bylaws:- F – 6579 (Nanded)<br>**To be uploaded on web site** |
| | | Hospital Ownership Documents:- |
| | | Hospital (Bombay Nursing Act) :-<br>**Z.P.No./ Health/B.N.H.A./5769/2023**<br>**To be uploaded on web site** |
| | | MPCB Certificate of Parent Hospital :-<br>**Z.P.No./ Health/B.N.H.A./5769/2023**<br>**To be uploaded on web site** |
| Hospital Type as Per Bombay Nursing Act :- **Z.P.No./ Health/B.N.H.A./5769/2023** | | |
| Hospital (Bombay Nursing Act) issuing Authority :- **Z.P.No./ Health/B.N.H.A./5769/2023** | | |
| Hospital Bed as per Certificate:- **100 Beds** | | |
| Name of the College / Institute<br>(As per First Affiliation letter) | : | Jijau College of B.Sc. Nursing, Markhel, Nanded. |
| Address | : | At. Post - Markhel, Tq. Degloor, Dist. Nanded – 431718 |
| Email ID | : | jijaubscn@gmail.com |
| Telephone / Mobile No.(s) | : | 9970601350 / 9561334777 |
| Website | : | www. jijaucollegeofbscnursing.org |
| College Code | : | 154166 |

**Here by I declare all relevant document uploaded are clear and visible on web site & are true as per my best knowledge**

**Any Other, Please Specify:-**

**Date:-**

Chairman of LIC

Member Of LIC

Member Of LIC

Dean/ Principal Stamp & Signature

Principal
Jijau College of B.Sc Nursing
Markhel TQ.Degloor Dist.Nanded

(०२३)

विशेष/ध.आ./मु.सा.वि./२म.

सत्यमेव जयते

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये ........ नांदेड उप-विभाग नांदेड ........ येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ- ६५७० (नांदेड)

श्री. व्यंकटराव राजेश्वरराव पाटील यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ३१/३/२००० रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सही

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
नांदेड उप-विभाग, नांदेड

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

विशेष–अ.जा./मुं. सा. वि./५० म.

क्रमांक [redacted]

सत्यमेव जयते

# नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महा/४८५/९९

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड

...ल तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरित्या नोंदणी करण्यात आली.

तारीख - 9 DEC 1999 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सहायक संस्था निबंधक, नांदेड उप-विभाग नांदेड

संस्थांचे सहाय्यक निबंधक
सहायक संस्था निबंधक
नांदेड उप-विभाग, नांदेड

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegao
Tq.Mukhed Dist.Naned

मा. धउआ नांदेड यांचे चौ. क्र. ६०२/२०२२ कलम २२ मधील दि. १७/०६/२०२२ च्या आदेशान्वये सुधारित परिशिष्ट 'ब' मंजूर करण्यात आले.

(२७)

# परिशिष्ट ब

क्रमांक : ४/२९४/२२
अर्जदाराचे नांव : ३/८
नकलेचा अर्ज दिनांक :
नक्कल तयार दिनांक : २७/०६/२२
नक्कल दिली तो दिनांक

## सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड

या संस्थेचे

## सुधारीत मेमोरँडम ऑफ असोसिएशन (ज्ञापन)

धर्मादाय उप आयुक्त
नांदेड विभाग, नांदेड

१) संस्थेचे नांव :- सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड

Exh-10

२) संस्थेच्या कार्यालया पत्ता :- श्री. व्यंकटराव राजेश्वरराव पाटील मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड

धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग नांदेड

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नांदेड विभाग, नांदेड

३) संस्थेचे उद्देश :-

१) ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाच्या सोयीसाठी बालवाडी, शाळा, आश्रमशाळा, कनिष्ठ महाविद्यालये, महाविद्यालय, तांत्रिक प्रशिक्षण केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, स्वंयरोजगार प्रशिक्षण केंद्र, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी कृषी वैद्यकिय महाविद्यालय , शेतकी शाळा, अपंग शाळा, मतीमंद, अंध शाळा, अपंग शेल्टर्ड वर्कशॉप इ.ची स्थापना करुन चालविणे मुला-मुलींच्या राहण्याची व जेवणाच्या सोयीकरीता वस्तीगृह स्थापन करणे व चालविणे तसेच वृध्दाश्रम कुष्ठधाम स्थापन करणे, बालकताईचे प्रशिक्षण केंद्र चालविणे.

२) मुला-मुलींच्या करीता संगणक, टंकलेखणाचे प्रशिक्षणाचे केंद्र तसेच शिवणकला प्रशिक्षण केंद्र चालविणे ग्रामीण व शहरी भागात केंद्रीय व राज्य समाजकल्याण, महिला व बाल कल्याण, केद्रीय समाजकल्याण बोर्ड महिला व बाल कल्याण बोर्ड, यांच्या अंतर्गत येणारे सर्व प्रकारचे कार्यक्रम राबविणे.

३) ग्रामीण, शहरी भागात कुटुंब कल्याण दारुबंदी व व्यसनमुक्ती सांस्कृतीक, सामाजिक शिबीरे, युवक कल्याणासाठी आयोजन करणे तसेच रक्तदान, नेत्रदान शिबीरे धर्मार्थ दवाखाने चालविणे अरोग्य विषयक विविध उपक्रम राबविणे तसेच राष्ट्रीय एकात्मता घडवून आणने इत्यादी.

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Nanded

४) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, समाजकल्याण बोर्ड, महिला बाल विकास प्रकल्प यांच्यामार्फत मिळणा-या योजना राबविणे तसेच जलसंवर्धन, पानलोट क्षेत्र, पडीत जमीनीचा विकास करणे, सकस आहार पुरविणे, पर्यावरण, पशुपालन, फळे रासायनीक प्रक्रिया, सैनिकी शाळा, समाजातील जागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच तालूका पातळीवर शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचे काम करणे चित्रकला विद्यालय, महाविद्यालय, अनाथाश्रम डी.एड., बि.एड., बि.पी.एड., इत्यादी संस्था चालविणे.

५) वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करणे व चालविणे आणि फिजियोथेरपी, डेंटल, होमियोपॅथी, पशुवैद्यकीय महाविद्यालय व संबंधित अभ्यासक्रमाचे रुग्णालय स्थापन करणे व चालविणे तसेच वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम स्थापन करणे व चालविणे रक्तपेढी, नेत्र पेढी, पॅथालॉजी यांची स्थापना करणे व चालविणे, रुग्ण वाहिकेची सुविधा उपलब्ध करून देणे.

६) औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय व वितरण केंद्र तसेच शेतीशी निगडीत कृषी केंद्र व वितरण केंद्र स्थापन करणे व चालविणे.

७) नर्सिंग पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रम व पॅरामेडीकल सायन्स अभ्यासक्रम स्थापन करणे व चालविणे.

८) तंत्रशिक्षण विद्यालय व उच्च तंत्र शिक्षण महाविद्यालय स्थापन करणे व चालविणे तसेच इतर नामांकित शाळा, महाविद्यालय यांच्या शाखा चालविण्यास घेणे दूरस्थ शिक्षणाच्या शाखा चालविण्यास घेणे.

**४) कार्यकारी मंडळाची यादी :**

**सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदाचे संपुर्ण नावे,

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Nanded

करण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी तसेच तालूका पातळीवर शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचे काम करणे चित्रकला विद्यालय, महाविद्यालय, अनाथाश्रम डी.एड., बि.एड ., बि.पी.एड , इत्यादी संस्था चालविणे.

४) **कार्यकारी मंडळाची यादी :**

**सरस्वती बहुउद्रदेशीय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड** या संस्थेच्या नियम व नियमावलीप्रमाणे या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा कार्यकारी मंडळाच्या सभासदाचे संपुर्ण नावे, पत्ता, पद, वय, राष्ट्रीयत्व व व्यवसाय पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र | सभासदांची संपूर्ण नावे | पत्ता | पद | वय | राष्ट्रीयत्व | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | लक्ष्मीबाई साहेबराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | अध्यक्षा | ३८ | भारतीय | समाजसेवा |
| ०२ | सुशीलाबाई नागनाथराव रेगुडे | मु.पो. मरखेल ता. देगलूर जि. नांदेड | उपाध्यक्षा | ३५ | भारतीय | घरकाम |
| ०३ | व्यंकटराव राजेश्वरराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | सचिव | ४२ | भारतीय | शेती |
| ०४ | रामचंद्र व्यंकटराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | सहसचिव | १९ | भारतीय | शिक्षण |
| ०५ | पद्माबाई बालाजीराव मोरे | मु.पो. वळग ता. देगलूर जि. नांदेड | कोषाध्यक्षा | २५ | भारतीय | घरकाम |
| ०६ | व्यंकटराव साहेबराव पाटील | मु.पो. लव्हारा, ता. उदगीर जि. लातूर | सभासद | ३० | भारतीय | शेती |
| ०७ | राजेश्वर संग्राम हांडे | मु.पो. मरखेल ता. देगलूर जि. नांदेड | सभासद | २५ | भारतीय | शेती |

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

५) आम्ही सहया करणारे **सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड** चे संस्थेचे सदस्य जाहीर करतो की संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० चे अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्यासाठी आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही आज रोजी एकत्र येवुन **सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड** ही संस्था आज दिनांक ०१/१०/१९९९ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही खालील सह्या केलेल्या आहेत.

| अ.क्र | सभासदांचे नांव | पत्ता | सह्या |
|---|---|---|---|
| ०१ | लक्ष्मीबाई साहेबराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | स्वाक्षरीत |
| ०२ | सुशीलाबाई नागनाथराव रेगुडे | मु.पो. मरखेल ता. देगलूर जि. नांदेड | स्वाक्षरीत |
| ०३ | व्यंकटराव राजेश्वरराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | स्वाक्षरीत |
| ०४ | रामचंद्र व्यंकटराव पाटील | मु.पो. गोजेगांव ता. मुखेड जि. नांदेड | स्वाक्षरीत |
| ०५ | पद्माबाई बालाजीराव मोरे | मु.पो. वळग, ता. देगलूर जि. नांदेड | स्वाक्षरीत |
| ०६ | व्यंकटराव साहेबराव पाटील | मु.पो. लव्हारा, ता. उदगीर जि. लातूर | स्वाक्षरीत |
| ०७ | राजेश्वर संग्राम हांडे | मु.पो. मरखेल ता. देगलूर जि. नांदेड | स्वाक्षरीत |

ठिकाण :

दिनांक :

वरील सह्या करणारे यांना मी ओळखतो त्यांनी आमच्या समक्ष सह्या केलेल्या आहेत.

(विशेष कार्यकारी दंडाधिकारी / वकील /सनदी लेखापाल /नोटरी) संपूर्ण नांव पत्ता व शिक्क्यासह

Secretory
Saraswati Bahuuddes[illegible]
Sevabhavi Sanstha, Goje[illegible]aon
Tq.Mukhed Dist.Nan[illegible]

मा. धर्मादाय उप आयुक्त नांदेड यांचे चौ.क्र. 602/2022 कलम 22 मधील दि. 17/06/2022 च्या आदेशान्वये सुधारित परिशिष्ट 'क' मंजूर करण्यात आले.

धर्मादाय उप आयुक्त
नांदेड विभाग, नांदेड

# परिशिष्ट क

## सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड

या संस्थेची

## सुधारीत नियम व नियमावली

१) **नियमावलीतील संदर्भीय शब्दांच्या व्याख्या :**

**व्याख्या :-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियम आणि नियमावलीतील व्याख्या करण्यात आलेल्या संज्ञा खाली स्पष्ट करण्यात आलेल्या अर्थाने वापरण्यात आलेल्या आहेत.

२) संस्था म्हणजे :- सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, गोजेगांव ता.मुखेड जि. नांदेड.

३) सभासद :- सभासद म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक ३ व ४ प्रमाणे निवडलेले सभासद

४) कार्यकारी मंडळ :- कार्यकारी मंडळ म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक ९व १० प्रमाणे निवडलेले कार्यकारी मंडळ.

५) अध्यक्ष :- अध्यक्ष म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक १० (ब) प्रमाणे निवडलेला अध्यक्ष.

६) उपाध्यक्ष :- उपाध्यक्ष म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक १० (ब) प्रमाणे निवडलेला उपाध्यक्ष.

७) सचिव :- सचिव म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक १० (ब) प्रमाणे निवडलेला सचिव.

८) सहसचिव :- सहसचिव म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक १० (ब) प्रमाणे निवडलेला सहसचिव.

९) कोषाध्यक्ष :- कोषाध्यक्ष म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक १० (ब) प्रमाणे निवडलेला कोषाध्यक्ष.

२) **कार्यक्षेत्र :-**

या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रा पुरतेच मर्यादीत रहील.

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegao
Tq.Mukhed Dist.Naned

**३) सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दत :-**

अ) संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणारी कोणतीही व्यक्ती जिचे वय १८ वर्षापेक्षा कमी नाही व ज्यांना संस्थेचे उद्देश व ही नियमावली मान्य आहे अशी व्यक्ती या संस्थेचे सभासद होण्यास पात्र राहील.

ब) सभसदत्वासाठी अशा व्यक्तीने संस्थेच्या सचिवाकडे लेखी अर्ज देणे आवश्यक राहील.

क) सभासदत्वासाठी झालेले अर्ज कार्यकारी मंडळाच्या मिटींगमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात येतील. सभासद होऊ इच्छीणा-या व्यक्तींना सभासद करुन घ्यावे किंवा करून घेवू नये याबाबतचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या मिटींगमध्ये कार्यकारी मंडळाच्या एकूण सदस्याचे ३/५ बहुमताने घेण्यात येईल व कार्यकारी मंडळाचा निर्णय एकूण सदस्यांचे व्यक्तीस लेखी कळविण्यात येईल व अशा व्यक्तीने या नियमावलीत निर्धारीत करण्यात आलेली सभासद फी संस्थेच्या कोषाध्यक्षाकडे किंवा सचिवाकडे सुचना प्राप्त झाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत जमा करणे अनिवार्य राहील.

ड) वरील नियम क्रमांक ३ (क) प्रमाणे सभासद फी मिळाल्या नंतर संबंधीत व्यक्तीच्या नावाची नोंद सभासद नोंद सभासद नोंदणी वहीमध्ये करण्यात येईल व संबंधीत व्यक्तीची स्वाक्षरी सभासद नोंदणीवहीमध्ये घेण्यात येईल. संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम सन १९७१ मधील नियम १५ नुसार सभासद नोदणी वही आवश्यक अनुसूची सहा या विहित नमुन्यात ठेवण्यात येईल. सभासद नोंदणी वहीचा विहीत नमुणा या सोबतच्या जोडपत्र एक प्रमाणे आहे.

**४) सभासदाचे प्रकार**

संस्थेच्या सभासद तीन प्रकारचे राहतील जे खालील प्रमाणे आहेत.

अ) **संस्थापक सभासद :-**

संस्थापक समयलेखावर (मेमोरंडम् ऑफ असोशीएशनवर) सह्या करणा-या व्यक्तींना संस्थापक सभासद समजण्यात येईल. संस्थापक सभासदांची सभासद फी म्हणून रूपये १५१/- राहील मेमोरंडम ऑफ असोसिएशन स्वाक्षरी करण्यापूर्वी जमा करणे अनिवार्य राहील संस्थापक सभासदाचे सभासदत्व अजिवन राहील.

ब) **आजीव सभासद :-** आजीव सभासदांची सभासद फी ५१/- राहील व त्याचे सभासदत्व आजीवन राहिल.

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

क) **साधारण सभासद :-** सभासदाची फि वार्षिक रुपये ११/- राहील व त्याचे सभासदत्व एका वर्षासाठी राहील.

५) **सभासदत्व रद्द होणे बावत :-**

संस्थेच्या सभासदांचे सभासदत्व खालील कारणास्तव रद्द होईल.

अ) सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर राहण्यासाठी गेल्यास.

ब) वार्षिक सभासद फि तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत ठेवल्यास.

क) नैतिक अध:पताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरला असेल तर.

६) **सर्वसाधारण सभा व त्यांचे अधिकार व कार्य:**

अ) वरील नियम क्रमांक ३ व ४ प्रमाणे नोंदणी झालेल्या सर्व सभासदांची मिळून सर्वसाधारण सभा बनेल सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सभासद भाग घेवू शकतात. ज्या सभासदाकडे सभासद फि तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी थकीत आहे असा सभासद सभेमध्ये भाग घेवू शकनार नाही. मात्र त्याने सभेच्या वेळेपूर्वी थकीत सभासद फि रितसर जमा केल्यास तो सभेमध्ये भाग घेवू शकतो.

ब) **सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्य खालील प्रमाणे राहतील**

१. कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे.

२. कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या हिशोब पत्रकास व वार्षिक अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

३. संस्थेच्या लेखा परीक्षणासाठी सनदी लेखापाल किंवा अधिकृत लेखापाल परिक्षकांची नियुक्ती करणे.

४. संस्थेच्या नियम व नियमावलीमध्ये सुधारणा किंवा बदल करणे.

५. कार्यकारी मंडळाची निवड करणे.

६. संस्थेच्या कार्याबद्दल किंवा कार्यक्रमाबद्दल कार्यकारी मंडळास मार्गदर्शक सूचना देणे.

७. सभासदत्व नाकारण्यात आलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यास त्यावर विचार करुन निर्णय देणे.

८. सर्वसाधारण सभेने घेतलेले निर्णय कार्यकारी मंडळावर व संस्थेच्या सर्व सभासदावर बंधनकारक राहतील.

७) **सर्वसाधारण सभेच्या सूचना व गणसंख्या :-**

अ) सर्वसाधारण सभेची वार्षिक सभा प्रत्येक एप्रिल महिण्यात घेण्यात येईल. सर्वसाधारण सभेची लेखी सूचना सभेच्या तारखेच्या कमीत कमी १० दिवसाचे आंत

Secretory
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

किंवा पुर्वी प्रत्येक सभासदास त्याचे सभासदत्व व त्याचे पत्यावर देण्यात येई किंवा पोष्टाने पाठविण्यात येईल.

ब) सर्वसाधारण सभेमध्ये एकूण सभासदाच्या २/३ सभासदांची उपस्थित गणपुर्तीसाठी आवश्यक राहील. सभेच्या निर्धारीत वेळेपासून अर्धा तासाचे आत गणपूर्तीस आवश्यक असलेली सभासद संख्या एकत्र न आल्यास सभा गणपुर्ती अभावी तहकुब करण्यात येईल. तहकुब झालेल्या सभेस गणपुर्ती आवश्यक असणार नाही. सभा कोणत्या दिवशी कोठे व किती वाजता होईल याची सुचना सर्व सभासदांना देणे अनिवार्य राहील तहकुब सभेमध्ये नविन विषय विचारात घेतले जाणार नाहीत.

८) विशेष साधारण सभा व तिचे कार्य :-

वार्षिक सर्वसाधारण सभेशिवाय विशेष साधारण सभा केंव्हाही घेता येईल. विशेष साधारण सभेत संस्थेच्या नियम आणि नियमावलीत करावयाच्या सुधारणा कार्यकारी मंडळाची निवडणुक व इतर तातडीची कामे विचारात घेण्यात येईल विशेष साधारण सभेची व गणपूर्ती नियम क्रमांक ७ (ब) व ७ (क) प्रमाणे राहील.

**९) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :-**

संस्थेचे कार्यकारी मंडळ एकूण सात सभासदांचे खालील प्रमाणे राहील :

१) अध्यक्ष २) उपाध्यक्ष ३) सचिव ४) सहसचिव

५) कोषाध्यक्ष ६) सदस्य - दोन

**१०) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-**

अ) कार्यकारी मंडळाच्या सभादाची निवडणुक प्रत्येक पाच वर्षांनी विशेष साधारण सभेत बहुमताने घेण्यात येईल.

ब) कार्यकारी मंडळावर निवडूण आलेले सभासद त्यांच्या मधुन अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष यांची निवड करतील.

क) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. मात्र नविन कार्यकारी मंडळ निवडून येईपर्यंत कार्यकारी मंडळ राहील.

**११) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**

**अध्यक्ष :-**

१. सर्वसाधारण सभेच्या वार्षिक (वार्षिक / विशेष ) मिटींगचे अध्यक्ष म्हणून सभेचे संचालन व नियंत्रण करणे.

Secretory
Saraswati Sahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojega
Tq.Mukhed Dist.Naned

(३६)

(6)

**कोषाध्यक्ष :-**

१. संस्थेच्या आर्थिक व्यवहार सांभाळणे व त्यावर नियंत्रण ठेवणे रक्कमेची देवाण घेवाण करणे.
२. आर्थिक व्यवहाराबाबत नियमित व योग्य प्रकारे हिशोब ठेवणे व ते सचिवांच्या सहीसाठी ठेवणे.संस्थेच्या हिशोबाची तपासणी करुन घेणे व वार्षिक हिशोब पत्रिका तयार करुन घेणे.

**सभासदांची कामे :**

सभेला हजर राहणे, मतदान करणे व संस्थेच्या कामात आवश्यक ती मदत करणे.

**१२) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-**

अ) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा तीन महिन्यातून एकदा घेणे आवश्यक राहील. संस्थेच्या कामाचे दृष्टीने आवश्यक असेल त्यावेळी सुध्दा कार्यकारी मंडळाची निवडणूक घेता येईल.

ब) कार्यकारी मंडळाच्या कमीत कमी ३ सभासदांनी कार्याकारी मंडळाची सभा बोलावण्याबाबत अध्यक्षाकडे लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी कार्यकारी मंडळाची सभा १५ दिवसाचे आत बोलावली पाहीजे अध्यक्षांनी सभा न बोलावल्यास मागणी करणा-या सदस्यापैकी कोणताही सदस्य त्याचे सहिने सभा बोलावू शकेल व उपस्थित सभासदातून एकास सभाध्यक्ष म्हणून निवड करुन काम करुं शकेल व त्या सभेत झालेले निर्णय बंधनकारक राहील.

**१३) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना कमीत कमी सात दिवस अगोदर कार्याकारी मंडळाच्या सर्व सभासदांना मिळाली पाहीजे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना मिळालेली सूचना व्यवस्थीत ठेवण्यात आलेल्या नोटीस पुस्तकातुन सर्व सभासदांना देण्यात येईल त्यावर संबंधीतांची सही घेण्यात येईल. सभासदांनी सही न केल्यास किंवा इतर काही कारणास्तव सभेची नोटीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात येईल. नोटीसमध्ये तारीख, वेळ , विषय, स्थळ स्पष्टपणे नमुद करण्यात येईल. नोटीसमध्ये कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये कार्यकारी मंडळाच्या एकूण सभासदाच्या २/३ सभासदांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक राहील. गणपूर्ती न झाल्यास ती सभा स्थगीत करुन दुस-या तारखेस बोलावण्यात येईल व या सभेला स्थगीत सभा म्हणून समजण्यात येईल. स्थगीत सभेला गणपूर्तीची आवश्यक राहणार नाही.

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

**१४) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-**

कार्यकारी मंडळाची निवडणुक दर पाच वर्षांनी साधारण सभेत बहुमताने करण्यात येईल या विशेष साधारण सभेत बहुमताने निवडणुक अधिका-यांची नियुक्ती प्रथम करण्यात येईल. निवडणुक अधिका-यांची नियुक्ती झाल्यानंतर सदर निवडणुक अधिकारी नामांकन पत्र स्विकारणे, त्यांची छाननी करणे, निवडणुकीस उभे राहण्यास पात्र असलेल्या सभासदांची नांवे जाहीर करणे ही कामे पुर्ण करील आवश्यकता असल्यास मतदान घेण्यात येईल व निवडणुक अधिकारी निवडुन आलेल्या सभासदाची नोंद कळविणे व जाहिर करणे.

**१५) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत :-**

कार्यकारी मंडळातील सभासदांच्या / पदाधिका-यांच्या मृत्युमुळे किंवा त्यांनी राजीनामा दिल्यामुळे किंवा नियम ५ मध्ये नमुद केलेल्या कारणास्तव सभासदत्व रद्द होईल किंवा कार्यकारी मंडळात रिक्तपद होणारी जागा कार्यकारी मंडळात उर्वरीत सभासदांच्या बहुमताने भरण्यात येईल व या प्रकारे निवड करण्यात आलेल्या सभासदांचा कार्यकाल त्या कार्यकारी मंडळाच्या कालावधी पुरताच राहील.

**१६) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कार्य :-**

१) सर्वसाधारण सभेच्या ठरावाची अंमलबजावणी करणे.

२) संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या इतर शाखेवर नियंत्रण ठेवणे.

३) संस्था व संस्थेव्दारे संचलित शाखांमध्ये कर्मचा-यांची बदली व बढती करणे कामवरुन कमी करणे.

४) संस्थेच्या उद्देशानुसार व या नियमावलीनुसार कार्य चालविणे, तसेच दैनंदीन कामाबाबत नियम तयार करणे.

५) वेगवेगळया खात्यातर्फे विहीत करण्यात आलेली माहिती त्या त्या खात्यात नियमित सादर करणे, आवश्यक नोंदवह्या अद्यायावत ठेवणे, संस्थेच्या आर्थिक व्यवहाराचे हिशोब ठेवणे व सुक्ष्म लेखापरीक्षकाकडून तपासून घेणे व सर्वसाधारण सभेत मंजुरीस ठेवणे.

**१७) हिशोबाचे वर्ष :-**

संस्थेच्या हिशोबाचे वर्षे १ एप्रिल ते ३१ मार्च असे रहील.

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

१८) **संस्थेची निधी, मिळकत व विनियोग:-**

संस्थेच्या सभासदाकडून मिळणारी फी, संस्थेला दान अगर देणगी मधून मिळणारी रक्कम, शासनाकडून मिळणारे अनुदान व इतर सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न हा संस्थेचा निधी राहील.

१९) **कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतूद :-**

संस्थेच्या कारणासाठी किंवा संस्थेकरीता कार्यकारी मंडळातील कोणताही पदाधिकारी, सभासद, उसनवार, कर्ज किंवा ठेवी म्हणून कोणतीही रक्कम, धर्मादाय आयुक्त यांच्या पूर्व परवानगीशिवाय घेणार नाही.

२०) **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री बाबत तरतूद :-**

अ) संस्थेला उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी न्यासाचा पैसा धर्मादाय आयुक्त यांच्या पुर्व परवानगी शिवाय गुंतविण्यात येणार नाही संस्थेच्या उद्देशाच्या पुर्तीसाठी आवश्यक असलेली स्थावर मालमत्ता खरेदी करण्यासाठी न्यासाच्या पैशाची गुतवणूक करता येईल.

ब) संस्थेच्या मालकीची स्थावर मालमत्ता विक्री करणे, बक्षिस व दान किंवा अदलाबदल करणनेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील परंतु यासाठी धार्मादाय आयुक्त याची पुर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील.

२१) **बँक खाते:-**

१) संस्थेचा पैसा कोणत्याही अनुसूचित बैक (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९३४ मध्ये व्याख्या दिल्या प्रमाणे) पोस्टल सेव्हींग बँकेत किंवा राज्य शासनाने मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कलम ३५ च्या कारणास्तव मान्यता दिलेले सहकारी बँकेत संस्थेच्या नावाने ठेवण्यात येईल.

२) संस्थेच्या बँकेतील खात्याचा व्यवहार अध्यक्ष व सचिव यांच्या संयुक्त सहीने करता येईल.

Secretary
Saraswati Bahuuddeshiya
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

## २२) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत:-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम १५ प्रमाणे संस्थेच्या सभासदाची नोंदवही अनुसूचिसह या विहीत नमुन्यात ठेवण्यात यईल. (या सोबतचे जोडपत्र एक पहा).

## २३) नियम व नियमावलीत बदल करण्याची तरतूद:-

संस्थेच्या नियम आणि नियमालीत बदल विशेष साधारण सभेच्या मिटींगमध्ये संस्थेच्या एकूण सभासदाच्या संख्येच्या २/३ सभासदांच्या बहुमताने करता येईल. संस्थेच्या नियम आणि नियमावलीत करावयाच्या प्रस्तावित बदलाचा मसुदा विशेष साधारण सभेच्या मिटींगच्या नोटीससोबत पाठविण्यात येईल किंवा आवश्यक राहील.

## २४) संस्थेच्या नावात व उद्देशात बदल करण्याची तरतूद :-

संस्थेच्या उद्देशात किंवा नावात बदल करणे, तसेच संस्थेचे पूर्णतः अथवा अंशतः दुस-या संस्थेत विलिनीकरण करणे आवश्यक आहे असे कार्यकारी मंडळास वाटल्यास कार्यकारी मंडळ या संबंधीचा लेखी अगर छापील प्रस्ताव संस्थेच्या सर्व सदस्यांना विशेष साधारण सभेच्या मिटींगच्या तारखेच्या १० दिवस अगोदर घेण्यात येईल किंवा पोष्टाने पाठविण्यात येईल सदर प्रस्ताव संस्थेच्या एकूण सभासदांच्या ३/५ सभासदांनी मान्य केल्याशिवाय अंमलात येणार नाही. दुसरी विशेष साधारण सभेची मिटींग पहिल्या मिटींगपासून १ महिन्यानंतर घेण्यात येईल (पहा संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १२ अ व १३ ब)

## २५) कार्यकारी मंडळातील सभासदांची नांवे कळविणे बाबत :-

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ मधील तरतुदीनुसार संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम ४ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ मधील नियम ७, प्रमाणे अनुसूची एक या विहित नमुण्यात (जोडपत्र दोन पहा) संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सभासदाबाबतची माहिति प्रत्येक वार्षिक साधारण सभेच्या मिटींगच्या तारखेपासून १४ दिवसाचे आत सहाय्यक संस्था निबंधक याचे कार्यालयात दाखल करण्यात येईल.

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Nanded

२६) **संस्थेच्या कर्मचा-या बाबत माहिती कळविणे:**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम (अ) व संस्था नोंदणी (महाराष्ट्र नियम १९७१ मधील नियम ८ नुसार अनुसुची दोन या विहित नमुण्यात (जोडपत्र तीन पहा) संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचा-याबाबतची माहिती प्रत्येक वर्षी एप्रिल महिण्यात सहाय्यक संस्था निबंधक याचे कार्यालयात दाखल करण्यात येईल.

२७) **संस्थेच्या अपरीवर्तनियता बाबत:**

संस्था कोणाही एका व्यक्तीस रद्द करता येणार नाही, संस्थेच्या मालमत्तेचा ताबा नियंत्रण कोणाही एका व्यक्तीकडे राहणार नसल्याने सरदची संस्था ही अपरीवर्तनीय संस्था असणार आहे.

२८) **लाभार्थी :**

संस्था निधी हा कोणाही व्यक्तीसापेक्ष नसून समाजसापेक्ष असणे आवश्यक आहे. संस्था समाजाचा भाग राहील. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचा लाभार्थी हा वैयक्तिक स्वरुपात असणार नाही.

२९) **उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतुद :**

संस्था ज्या उद्देशावरती कार्यरत असेल त्यावर खर्च करण्याचा असल्यास तो त्यासाठी खर्च करता येईल मात्र इतर सर्व फंड संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी करणेचा आहे.

३०) **विसर्जन :**

जर काही कारणांमुळे संस्था बरखास्त करावयाची झाली तर वरीलप्रमाणे सर्व सभासदांना १० दिवस अगोदर नोटीस देऊन कळवण्यात येईल. याबाबत सुध्दा सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या उपस्थित सभासद संख्येच्या २/३ गणसंख्येने तसा ठराव संमत करावा लागेल. संस्थेचे सर्व देणे घेणे आर्थिक व्यवहार पूर्ण करावे लागतील संस्थेची स्थावर जंगम, शिल्लक मालमत्ता नोंदणीकृत संस्थेस दान / देणगी म्हणून दिली जाऊ शकते तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या कलम १३ त १४ नुसार कार्यवाही पूर्ण करावी लागेल. संस्थेचे विसर्जन झाल्यानंतर जी काही संस्थेची सर्व दायित्व अदा केल्यानंतर शिल्लक राहिलेली मालमत्ता व निधीचे हस्तांतरण भारतीय आयकर कायदा १८६१ च्या कलम १२ अ अन्वये नोंदणीकृत असलेल्या तसेच ज्या सार्वजनिक धर्मादाय

Secret...
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha Gojegaon
Tq.Mukhed Dis. Naned

प्रमाणित करण्यात येते की, ही प्रत सरस्वती बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, गोजेग ता.मुखेड जि. नांदेड या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| अ.क्र | सभासदांचे नांव | हुद्दा | सह्या |
|---|---|---|---|
| ०१ | लक्ष्मीबाई साहेबराव पाटील | अध्यक्ष | स्वाक्षरीत |
| ०२ | सुशीलाबाई नागनाथराव रेगुडे | उपाध्यक्ष | स्वाक्षरीत |
| ०३ | व्यंकटराव राजेश्वरराव पाटील | सचिव | स्वाक्षरीत |

Copy write by
Copy Read by
Copy Compare by

...धीक्षक
...नोंदणी कार्यालय
...विभाग,नांदेड

Secretary
Saraswati Bahuuddeshiy
Sevabhavi Sanstha, Gojegaon
Tq.Mukhed Dist.Naned

दाखल क्र. ९०७५/०८

भारतीय गैर न्यायिक INDIA NON JUDICIAL

भारत

रु.5000 Rs.5000

पाँच हजार रुपये FIVE THOUSAND RUPEES

सत्यमेव जयते

INDIA

महाराष्ट्र MAHARASHTRA   1 - JUL 2008   331679

अ.क्र किमत दिनांक
२९९९
खरेदीदाराचे नाव श्री. व्यंकटराव पिता राजेश्वरराव पाटील
कोणाकरिता स्वतःकरिता
रहीमबेग आगाबेग मिर्झा.
मु.वि.दु.नि.का.देगलूर प.क्र.२१८/२००५

रा. गोजेगांव
ता. मुखेड

25 JUN 2008

विनामोबदला दानपत्र जमीन

दानपत्र जिरायत जमीन बाजार भाव किंमत (१२५०००) एक लाख पंचेवीस हजार रुपये

मौजे मरखेल तालुका देगलूर जिल्हा नांदेड येथील जमीन गट नंबर (२४६) क्षेत्रफळ (३) हेक्टर (५०) आर पोट खराब (०-०३) आर आकार रुपये (२-४२) पैसे पैकी माझा संपूर्ण हिस्सा (०-६१) आर आकार रुपये (०-५१) पैसे चे दानपत्र मात हेक्टर आकार रुपये (०-९७) पैसे वि.क्रं. (६)

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR

| द | ग | ल |
|---|---|---|
| द.क्र. ९०७५ /२००८ | | |
| ९ | ८ | |

| | |
|---|---|
| लिहून घेणार | सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगाव तालुका मुखेड जिल्हा नांदेड तर्फे सह सचिव श्री. रामचंद्र पिता व्यंकटराव पाटील वय २८ वर्ष धंदा शेती राहणार मौजे गोजेगाव तालुका मुखेड जिल्हा नांदेड |
| लिहून देणार | व्यंकटराव पिता राजेश्वरराव पाटील वय ५८ वर्ष धंदा शेती राहणार मौजे गोजेगाव तालुका मुखेड जिल्हा नांदेड |

दानपत्र लिहून देतो की तुकडी नांदेड पोट तुकडी देगलूर दु. नि. देगलूर यांचे कार्य क्षेत्रातील तसेच जि. प. नांदेड पं. स. देगलूर पैकी ग्रा. पं. मौजे मरखेल येथील जमीन गट नंबर (२४६) क्षेत्रफळ (२) हेक्टर (५०) आर पोट खराब (०-०३) आर आकार रुपये (३-४२) पैसे पैकी माझे जानी मालकी व ताब्यातील संपूर्ण हिस्सा (०-६१) आर आकार रुपये (०-५१) पैसे मधला भाग ज्याची चतुःसीमा पूर्वेस देगलूर हणेगाव रोड पाश्चिमेस पादन व मधुकर पिता बाबाराव पाटील यांचे शेत दक्षिणेस यादवराव पिता काळबाराव धुमाळे यांची गट नंबर (२४६) पैकी जमीन उत्तरेस सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगाव ची जमीन ह्या प्रमाणे चतुःसीमेचे आंतील जमीन व त्यातील जल तरु पाषाणा सहीत मी तुमचे पासून कांही ही मोबदला न घेता दान देऊन तुमच्या ताब्यात दिलो आहे ते तुम्ही

Sub-Registrar ... DEGLOOR
OF THE SUB REGISTRAR DEGLOOR

| | ग | ल |
|---|---|---|
| क्र. | १०७५ | /२००८ |
| | २ | ८ |

स्वीकारला आहात तरी आता तुम्ही वरील जमीनीवर मालकी
झाल्याने ताबा ठेवून उपभोग घेत जावे. या पुढे सदरी जमीनीवर
माझा किंवा माझे वारस वगैरे चा कोणत्याही प्रकार चा हक्क
राहीला नाही. वरील जमीनीवर सरकारी व खाजगी बोझा नाही
निघाल्यास सर्व प्रकार चे मारले गी करीन तुम्हास तोशीस लागु
देणार नाही. लिहून घेणार हे स्वतः वहिती करणारे शेतकरी
आहेत. लिहून देणार आदिवासी जमातीचा नाही. सबब हा
दस्तऐवज दानपत्र मी माझे राजी खुशीने व स्व संतोषाने
लिहून दिलो तें सही: क. दिनांक १-७-२००८ ई--

दस्तुर: किशनराव कु. द. ले. किशनराव

लिहून देणार

व्यंकटराव पिता राजेश्वरराव पाटील

लिहून घेणार

सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था
गोजेगाव ता: मुखेड जि: नांदेड तर्फे
सह सचिव रामचंद्र पिता व्यंकटराव पाटील

साक्षीदार

१ [signature] किरवळे [illegible] किशनराव रा. गोजेगाव

२ [signature] जाधव सूर्यकांत माधवराव रा. [illegible]

३) [signature] प्रकाश रामराव पंचाळ रा. गोजेगाव.


Sub-R[illegible]

OFFICE OF THE SUB REGISTRAR
दुय्यम निबंधक देगलूर
DEGLOOR


| ग | ल |
|---|---|
| क्र. १०४५ | /२००८ |
| ३ | ८ |

भारतीय गैर न्यायिक INDIA NON JUDICIAL

भारत

एक हजार रुपये | ONE THOUSAND RUPEES

रु.1000 | Rs.1000

सत्यमेव जयते

INDIA

महाराष्ट्र MAHARASHTRA

A 942850

अ.क्र. वि. क्र. दिनांक 25 JAN 2007

५२२५

५२२८

मु.दि.दु.नि.का. देगलूर प.क्र. १६/०००३

... JAN 2007

आकार रुपये (१=१९) पैसे चा आहे. त्या पैकी (६१) आर आकार रुपये (०=५९) पैसे चे खरेदीखत प्राप्त हेक्टर आकार रुपये (०=९८) पैसे.

वि. क्र. (६)

लिहून घेणार. सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगाव तालुका मुखेड तर्फे सचिव श्री. व्यंकटराव पिता राजेश्वरराव पाटील वय ५० वर्ष धंदा शेती राहणार मौजे गोजेगाव पोष्ट गोजेगाव तालुका मुखेड जिल्हा नांदेड

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR.

| द ग ल | |
|---|---|
| ८९ | २००८ |
| २ | ९९ |

भारतीय गैर न्यायिक INDIA NON JUDICIAL

एक हजार रुपये ONE THOUSAND RUPEES

रु.1000 Rs.1000

सत्यमेव जयते

INDIA

महाराष्ट्र MAHARASHTRA

25 JAN 2007

A 942930

५२२६

५२२४

Shonde

25 JAN 2007

लिहून देणार : (१) मनोहर पिता संग्राम इंडे वय २८ वर्ष धंदा शेती राहणार मौजे मरखेल पोष्ट मरखेल तालुका देगलूर जिल्हा नांदेड
(२) रामदास पिता माधव मारेगावे वय २० वर्ष धंदा शेती राहणार मौजे गोजेगाव पोष्ट गोजेगाव तालुका मुखेड जिल्हा नांदेड

कारणे खरेदीखत लिहून देण्यात येते की आम्ही आमचे कायदेशीर निकडी च्या गरजे साठी म्हणून

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR.

| दु गा हने | |
|---|---|
| ८९ | २००६ |
| ३ | २२ |

भारतीय गैर न्यायिक INDIA NON JUDICIAL

सत्यमेव जयते

INDIA

एक हजार रुपये ONE THOUSAND RUPEES

रु.1000 Rs.1000

महाराष्ट्र MAHARASHTRA

A 942931

अ.क्र. विक्री दिनांक 25 JAN 2007

५२२०

४२२८

मु.द्रि.नि.का. देगलूर प.क्र. १६/०००२३

25 JAN 2007

भरणा: रोख (११५०००) एक लाख पंधरा हजार रुपये आम्हास तुमचे कडून आगोदर नगदी वसूल झाले आहेत. भरणें बद्दल कांही उजर व तक्रार राहीली नाही.

सदरी रक्कमे च्या पोटी जमीन तुकडी नांदेड पोट तुकडी देगलूर दु. नि. देगलूर यांचे कार्य क्षेत्रातील तसेच जि. प. नांदेड पं. स. देगलूर पैकी ग्रां. पं. मौजे मरखेल येथील जमीन गट नंबर (२४६) क्षेत्रफळ (२) हेक्टर (५०) आर पोट खराब (०२) आर आकार रुपये

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR

| दस्त | |
|---|---|
| ५२ | २००७ |
| ४ | ७७ |

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये

सत्यमेव जयते

Rs. 500

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

25 JAN 2007

B 101792

दिनांक

५२२५

५२२४

गु.नि.दु.नि.का. देगलूर प.क्र. १६/२००३

19 JAN 2007

(१=४२) पैसे या मध्ये आमचे जानी मालकी व ताब्यातील संपूर्ण हिस्सा (१) हेक्टर (२२) आर आकार रुपये (१=१९) पैसे चा आहे. त्या पैकी (६१) आर आकार रुपये (०=५९) पैसे उत्तरे कडील बाजूचा भाग याची चतुःसीमा पूर्वेस हणेगाव देगलूर रोड पश्चिमेस पाणंद व मधुकर पिता बाबाराव पाटील यांचे शेत दक्षिणेस व्यंकटराव पिता राजेश्वरराव पाटील यांनी आज रोजी घेतलेली जमीन उत्तरेस दिगंबर पिता कोंडीबा यांचे शेत या प्रमाणे चतुःसीमेचे आंतील जमीन व त्यावील

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR

| | |
|---|---|
| दु नि क्र | |
| ८९ | २००७ |
| ५ | ११ |

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

AA 569888

25 JAN 2007

५२२८

५२२४

Dhonde

14 JAN 2007

जल तरू पाषाण सहीत आम्ही तुम्हास विक्री करून ताब्यात
दिली आहेत तरी आता तुम्ही वंश परंपरा मालकी नात्याने
उपभोग घेत जावे. या पुढे सदरी जमीनीवर आमचा किंवा
आमचे वारस वगैरे चा कोणत्याही प्रकार चा हक्क राहीला.
नाही. वरील जमीनीवर सरकारी व खाजगी बोझा नाही.
निघाल्यास सर्व प्रकार चे वारले आम्ही करून तुम्हास.
तोषीस लागु देणार नाहीत. लिहून घेणार हे स्वतः वाहिती.

Sub-Registrar

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEGLOOR

| दु नि ल | |
|---|---|
| ६९ | २००६ |
| ६ | ९९ |

रणारे शेतकरी आहेत. लिहून देणार आदिवासी जमातीचे नाहीत.
सबब हा दस्तऐवज खरेदीखत आम्ही आमचे राजी खुशीने व
स्व संतोषाने लिहून दिलेत सही फ. दिनांक २५-१-२००८ ई
दस्तुर- किशनराव कु. द. ले. (किशनराव)

लिहून देणार नं- (१)

(signature)

मनोहर पिता संग्राम हंडे

लिहून देणार नं- (२)

(signature)

रामदास पिता माधव मादेगावे

लिहून घेणार

(signature)

सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी
संस्था गोजेगाव ता. मुखेड तर्फे
सचिव श्री व्यंकटराव पिता राजेश्वरराव
पाटील

साक्षीदार

१ (signature) [illegible]

२ (signature) [illegible]

OFFICE OF THE SUB REGISTRAR DEG...

| | |
|---|---|
| ८९ | २००८ |
| ८ | ११ |